# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University

(formerly University of Pune)

## नोंदणीकृत पदवीधर यांची अधिसभेवरील सदस्य पदासाठी निवडणूक

## जाहिर प्रकटन

निवडणूक सूचना क्रमांक साफुपुविनि/(२८)(२)(न)/१२०, दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ अन्वये वर उल्लेख केलेल्या निवडणुकीसाठी विहित मुदतीत प्राप्त झालेल्या उमेदवारी अर्जांची छाननी निवडणूक विभागात शुक्रवार, दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२२ रोजी करण्यात आली. त्यानुसार जाहीर प्रकटन साफुपुविनि/१३६, दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२२ अन्वये निवडणुकीसाठी अंतिम उमेदवारांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

१) उमेदवारांची संख्या निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त असल्यामुळे नोंदणीकृत पदवीधरांना अधिसभेवर निवडून देण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या निवडणूक सूचनेनुसार रविवार, दि. २० नोव्हेंबर, २०२२ रोजी सूचनेस जोडलेल्या परिशिष्टामधील मतदान केंद्रावर सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत निवडणूक घेण्यात येईल.

२) मतदाराने मतदानास येताना स्वतःचा फोटो असलेले ओळखपत्र, उदा. शासकीय/निमशासकीय सेवकांचे कार्यालयीन ओळखपत्र, आधारकार्ड, पारपत्र, वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसेन्स), किंवा सर्वसाधारण निवडणुकीसाठी सक्षम प्राधिका-यांनी दिलेले फोटोसहित ओळखपत्र किवा आयकर अधिका-यांनी (इन्कम टॅक्स) दिलेले फोटोसहित ओळखपत्र (पॅन कार्ड) किंवा तत्सम फोटोसहित ओळखपत्र आणणे आवश्यक आहे. मतदान केंद्रावरील निवडणूक अधिका-यांना वरीलपैकी एक ओळखपत्र दाखविल्याशिवाय मतदारांना मतपत्रिका मिळणार नाही.

४) मतदान केंद्रात जे मतदार सायंकाळी ५.०० नंतर येतील त्यांना मतपत्रिका देण्यात येणार नाही.

५) मंगळवार, दि. २२ नोव्हेंबर, २०२२ रोजी, सकाळी ०८.०० वाजल्यापासून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसर पुणे - ४११००७ येथे मतमोजणीस सुरुवात होईल व मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात येईल, मतमोजणीच्या वेळी उमेदवार स्वतः किंवा उमेदवाराने लेखी अधिकार पत्र दिलेला त्याच मतदार यादीतील मतदार असलेला त्याचा प्रतिनिधी किमान एक तास अगोदर पूर्व सूचना देऊन ओळखपत्र दाखवून हजर राहू शकेल.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/१४८
दिनांक : १७/११/२०२२

(डॉ. प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

प्रत : सर्व संबंधित.